नि.फौ.ख.क्र.१८/२०२४

सरकार -वि- गणराज **नि.क्र.२४**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – कवळु हरिचंद अवचट

वय. २५ वर्षे, व्यवसाय – शेती,

निवासस्थान – सालई बु., ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत –**

घटनेबाबत मला काही माहिती नाही. माझेसमक्ष मारहाणीची कोणतीही घटना घडलेली नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या प्रकरणास दुजोरा देत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.११.२०२३ रोजी मी शेतात काम करीत असतांना आरोपी क्र.१ व फिर्यादीचा मुलगा हे शेतात जोरजोरात भांडण करीत असतांना मला दिसुन आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फिर्यादी, तिचा मुलगा यांचे आरोपी राधेश्यामसोबत भांडण सुरू होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर भांडणात आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी सलाखीने मारहाण करून तिला जखमी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तिच्या डोक्यातुन रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर फिर्यादी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यासाठी गेली होती. आता मला माझे जाबाबतील अधोरेखांकित भाग–अ मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आले. त्यामुधील मजकुर बरोबर नाही. पोलिंसानी त्यामध्ये का नमुद केले नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब माझे सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. मी आरोपींना ओळखतो. ते माझ्याच गावचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आज दोघेही सोबतच न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे सांगण्यानुसार मी आज साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्रीमती उपाध्याय यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझेसमक्ष कोणतीही घटना घडली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २०.०७.२०२६ | दि.२०.०७.२०२६ |